# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

(नॅकद्वारे A+दर्जा)

विद्यार्थी विकास

संचालक (का.) : २४०३१३२
विद्यार्थी विकास : २४०३१३३
फॅक्स : (०२४०) २४०३१३४, २४०३१५०
तार : बामुसिटी
Web Site : www.bamu.ac.in
E-Mail : dsw@bamu.ac.in

डॉ. कैलास अंभुरे
संचालक,
विद्यार्थी विकास मंडळ
विद्यापीठ परिसर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००४
(महाराष्ट्र)
मो. क्र. : ७५८८१६५२२१

संदर्भ /संविवि/२०२५-२६/19774-20305

दिनांक : ०७.१०.२०२५

प्रति,
मा. प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालये,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ,
**छत्रपती संभाजीनगर.**

प्रति,
मा. विभाग प्रमुख
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ,
**छत्रपती संभाजीनगर.**

प्रति,
मा. संचालक
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ परिसर,
उपकेंद्र, धाराशिव.

**विषय : जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा २०२५ बाबत...**
**संदर्भ : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जा.क्र.३११६ दि. २४.०९.२०२५ रोजीच्या पत्रानुसार...**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयानुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ म. पुणे यांच्या वतीने व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर व छत्रपती संभाजीनगर जिल्हा सहकारी बोर्ड म. छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने **'जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा'** आयोजित करण्यात आली आहे. सदरील स्पर्धा **सोमवार, दि. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी देवगिरी महाविद्यालय, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर** येथे होणार आहे.

तरी विद्यापीठ विभागातर्फे / महाविद्यालयातर्फे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभाग नोंदवण्यासाठी प्रेरित करावे, ही विनंती.

धन्यवाद,

**सोबत :** स्पर्धेचे माहितीपत्रक.

**संचालक**
**विद्यार्थी विकास मंडळ**

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,**
**जा.क्र.** 3116
**दिनांक** २५/०९/२०२५

# परिपत्रक

आंतरराष्ट्रीय सहकारी वर्ष २०२५ चे औचित्य साधून महाराष्ट्र राज्यात सहकारी शिक्षण, प्रशिक्षण, प्रचार व प्रसिद्धीचे कार्य करणाऱ्या महाराष्ट्र राज्य सहकारी संघ म.पुणे यांच्या वतीने व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर व छत्रपती संभाजीनगर जिल्हा सहकारी बोर्ड म. छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने **जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धाचे आयोजन दिनांक १३/१०/२०२५ वार सोमवार रोजी सकाळी १०.०० ते स्पर्धासंपेपर्यंत देवगिरी महाविद्यालय, स्टेशन रोड छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी करण्यात आले आहे. या जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धाचा विषय "सहकारातून समृद्धी" असा आहे.** या स्पर्धेत प्रथम येणाऱ्या स्पर्धकास महाराष्ट्र राज्य सहकारी संघ म.पुणे यांच्या वतीने रु.१०००.०० (अक्षरी एक हजार केवळ) व द्वतीय स्पर्धकास रु. ५००.०० (अक्षरी पाचशे केवळ) बक्षीस देण्यात येणार आहे. प्रथम येणाऱ्या स्पर्धकास महाराष्ट्र राज्य सहकारी संघ म.पुणे यांच्या वतीने माहे नोव्हेंबर २०२५ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय वकृत्व स्पर्धात सहभागी होता येणार आहे. स्पर्धात सहभागी झ ाल्यानंतर नियमाप्रमाणे प्रवास भत्ता आदा करण्यात येणार आहे.

## जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धाच्या अटी व नियम

१. स्पर्धेचा विषय सहकारातून समृद्धी या विषया व्यतरिक्त इतर विषयावर वक्तृत्व करता येणार नाही.
२. वरिष्ठ महाविद्यालयतील युवक-युवती या स्पर्धेसाठी पात्र असतील
३. स्पर्धेत सहभागी होणा-या युवक-युवतींना महाविद्यालयाचे पत्र किंवा त्यांचे ओळख पत्र सादर करणे अनिवार्य आहे.
४. या स्पर्धेचे प्रवेश शुल्क प्रती स्पर्धक रु. १००.०० असून एका प्रतिनिधीस स्वतःच्या नावावर केवळ एकदाच प्रवेश शुल्क भरता येईल.
५. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रतिनिधीस ७ + ३ = १० मिनिटे वेळ देण्यात येईल.
६. एकदा वक्तृत्व सादर केल्यानंतर पुन्हा संधी देण्यात येणार नाही.
७. विजेता स्पर्धकाच्या घोषने बाबत मा. परीक्षकांचा निर्णय हा अंतिम असेल.
८. स्पर्धा संपल्यानंतर ३० मी. मध्ये विजेत्या स्पर्धकाची घोषणा करून पारितोषिक वितरण समारंभ मा. प्रमुख पाहुण्याच्या हस्ते करण्यात येईल. विजेत्या स्पर्धकाची मुलाखात घेऊन पुढील कार्यवाही साठी महाराष्ट्र राज्य सहकारी संघ म.पुणे यांना पाठवण्यात येईल.

वरील सर्व अटीस अधीन राहून जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा पार पाडण्यात येईल. स्पर्धेत भाग घेणाऱ्या युवक-युवतींनी शुल्काची रक्कम रु. १००.०० स्पर्धेच्या किमान ०८ दिवस अगोदर **श्रीमती एस. यु. सुर्यवंशी, जिल्हा सहकार विकास अधिकारी, छत्रपती संभाजीनगर जिल्हा सहकारी बोर्ड मर्या. छत्रपती संभाजीनगर, स्टेटबँक कॉलनी, न्यू उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर मो.क्र. ९९२२२९७४४५ यांच्याकडे जमा करावी.**

जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर
**(Samure Jadhav)**
**Dist. Deputy Registrar**
**Co-operative Societies Chhatrapati Sambhajinagar**